# विद्यार्थी कल्याण विभाग

## वार्षिक अहवाल ०१ जुलै २०१५ ते ३१ जुन २०१६

* प्रत्येक वर्षी विद्यार्थी कल्याण विभागामार्फत शासन परिपत्रकाप्रमाणे विविध महापुरूषांच्या जयंती/पुण्यतिथीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच शासनाच्या वेळोवळी प्राप्त आदेशानुसार विविध उपक्रम राबविले जातात.

* दि. १५ ऑगस्ट, २०१५ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित ध्वाजारोहन कार्यक्रमात विभागामार्फत राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

* दि. १७ सप्टेंबर, २०१५ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित विद्यापीठ ध्वजवंदन कार्यक्रमात विभागामार्फत विद्यापीठगीत व राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

* दि. २७ ऑगस्ट, २०१५ रोजी विद्यापीठ परीसर विद्यार्थी परीषदेची लोकशाही पध्दतीने निवडणूक घेण्यात आली. विद्यापीठ परीसर विद्यार्थी परीषदेच्या सचिवपदी जाधव निलेश मधुकरराव, (सामाजिकशास्त्र संकुल) यांची निवड झाली.

* दरवर्षी १७ सप्टेंबर (विद्यापीठ वर्धापन दिन) रोजी उत्कृष्ट वार्षिक अंकास तसेच राज्यस्तरीय, पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये पारितोषीक प्राप्त विद्यार्थ्यांना गौरविण्यात येते. २०१५ मध्ये 'दृष्टी' या वार्षिक अंकास प्रथम, 'प्रेरणा' तसेच 'पोशिंदा' या अकांना विभागुन द्वितीय व 'वेदन' या अकांस तृतीय पारीतोषीक व 'मानवता' 'ज्युडीसिअम डाई' या अंकांना उत्तेजनार्थ पारीतोषीक देण्यात आले. राज्यस्तरीय, पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये विविध कलाप्रकारात प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषीक प्राप्त विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडण्यात आली आहे. उपरोक्त पारिताषिकांचे वितरण आदरणीय संत बाबा बलविंदरसिंगजी, गुरूद्वारा लंगरसाहिबा बोर्ड, कौठा, नांदेड यांच्या हस्ते करण्यात आले.

* दि. ०२ ऑक्टोबर, २०१५ रोजी विद्यार्थी कल्याण विभागामार्फत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महात्मा गांधी यांची जयंती साजरी करून संपूर्ण विद्यापीठ परिसर झाडून साफ–सफाई करण्यात आली. या अभियानांतर्गत प्रत्येक शनिवारी संकुल व प्रशाकीय विभागांची स्वच्छता करण्याचा संकल्प करण्यात आला.

* स्वा.रा.ती.म.विद्यापीठचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव सहयोग सेवाभावी संस्थेचे, इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपूरी, नांदेड येथे दि. १४/१०/२०१५ ते १७/१०/२०१५ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. युवक महोत्सवाचे उद्‌घाटन दि. १४ ऑक्टोबर २०१५ रोजी मा.खा. रावसाहेब दानवे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास मा. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, मा. आ. डॉ. तुषार राठोड, तसेच विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. पंडित विद्यासागर उपस्थित होते. तसेच बक्षीस वितरण व समारोप कार्यक्रम दि. १७ ऑक्टोबर २०१५ रोजी झाला. बक्षींस वितरण कार्यक्रमास मा. आ. डी. पी. सावंत, मा. आ. हेमंत पाटील, तसेच विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. पंडित विद्यासागर उपस्थित होते.

* विद्यार्थी कल्याण विभागातर्फे दि. १० डिसेंबर, २०१५ हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा करण्यात आला. मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने स्वा. रा.ती.म. विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलामध्ये दि. १०/१२/२०१५ रोजी प्रा.विठ्ठल दहिफळे, पीपल्स कॉलेज, नांदेड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रा. विठ्ठल दहिफळे यांनी 'मानव अधिकार : सिध्दांत आणि व्यवहार' या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

* विद्यार्थी कल्याण विभागातर्फे दि. २५ डिसेंबर, २०१५ रोजी श्री. अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस 'सुशासन दिन' (Good Governance Day) म्हणून साजरा करण्यात आला. सुशासन दिनाच्या निमित्ताने स्वा.रा.ती.म. विद्यापीठातील सीनेट सभागृहामध्ये प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार, देगलूर महाविद्यालय, देगलूर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार यांनी 'तणाव मुक्त व्यवस्थापन' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

* शैक्षणिक वर्ष २०१५–१६ चा पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव दि. ०८ ते १२ जानेवारी २०१६ दरम्यान सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, गुजरात येथे आयोजित करण्यात आला होता. या युवक महोत्सवामध्ये स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता. युवक महोत्सवात देशमुख किरण प्रकाशराव या विद्यार्थ्यास वक्तृत्व या स्पर्धेत प्रथम पारितोषीक, देवकांबळे गंगेश अशोक या विद्यार्थ्यास कोलाज स्पर्धेत द्वितीय पारितोषीक, राठोड प्रवीण प्रकाशराव या विद्यार्थ्यास मिमिक्री स्पर्धेत तृतीय पारितोषीक, तसेच धुमाळ तेजस विश्वनाथ या विद्यार्थ्यास तबलावादन या स्पर्धेत तृतीय पारितोषीक मिळाले. सांघिक कलाप्रकारात फोक ऑर्केस्ट्राला तृतीय पारितोषीक मिळाले. या कलाप्रकाराला धुमाळ तेजस, अभिजीत जाधव, तोटरे कृष्णा, देवकी देशमुख, अर्पुवा कुलकर्णी, स्वरुप देशपांडे, स्वरेश देशपांडे, मठपती जयपाल,झुंगा मनोज यांनी सहभागी नोंदविला होता. तसेच लोकनृत्य कलाप्रकाराला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. त्यात भुसेवार अमोल, जोगदंड सबमिथ्य, कोकरे ऋषीप्रसाद, देशपांडे अशीष, राऊत निखील,पांडे संदेश, श्रावण रंजीकुमार, ठोके अक्षय, खिल्लारे सुशील, अक्षय शहाणे यांनी सहभाग घेतला होता.

* दि. २६ फेब्रुवारी, २०१६ रोजी विद्यापीठाच्या दिक्षांत समारोह कार्यक्रमात विभागामार्फत राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत सादर करण्यात आले.

* शैक्षणिक वर्ष २०१५–१६ चा राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य' आंतर विद्यापीठ युवक महोत्सव दि. २२ ते २६ जानेवारी २०१६ दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथे आयोजीत करण्यात आला होता. युवक महोत्सवात स्कीट (प्रहसन) या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले या स्पर्धेत मनोज झुंगा, मिलींद जमदाडे, विजय मस्के, वर्धन चौधरी, निनाद देशपांडे, लक्ष्मण गायकवाड या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच स्वरुप देशपांडे या विद्यार्थ्यास सुरवाद्य या स्पर्धेत द्वितीय पारितोषिक, राठोड प्रवीण प्रकाशराव या विद्यार्थ्यास मिमिक्री स्पर्धेत द्वितीय पारितोषिक, तसेच लोकनृत्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळाले. लोकनृत्य स्पर्धेत भुसेवार अमोल, जोगदंड सबमिथ्य, कोकरे ऋषीप्रसाद, देशपांडे अशीष, राऊत निखील, पांडे संदेश, श्रावण रंजीतकुमार, ठोके अक्षय, खिल्लारे सुशील, अक्षय शहाणे यांनी सहभाग घेतला होता.

* दि. २६ जानेवारी, २०१६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित ध्वाजारोहन कार्यक्रमात विभागामार्फत राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

* देशमुख किरण प्रकाशराव (वक्तृत्व) देवकांबळे गंगेश अशोक (कोलाज) हे पश्चिम विभागीय युवक महोत्सवात अनुक्रमे प्रथम व द्वितीय पारितोषिक प्राप्त केल्यामुळे उपरोक्त विद्यार्थ्यांनी आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सव म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर येथे दि. १५ ते १९ फेब्रुवारी २०१६ दरम्यान आयोजित युवक महोत्सवात विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले होते. या राष्ट्रीय युवक महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेमध्ये किरण प्रकाशराव देशमुख या विद्यार्थ्याने 'भारत की सांस्कृतिक विरासत' या विषयावर सुंदर अशी मांडणी करून द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. द्वितीय क्रमांक प्राप्त केल्यामुळे २०१७ मध्ये संपन्न होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवासाठी तो पात्र ठरला आहे.

* शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर अतिशय साध्या पद्धतीने विद्यापीठ परिसराचा एक दिवसीय विद्यार्थी स्नेह संमेलनाचा कार्यक्रम दि. ११ मार्च, २०१६ रोजी उत्साही वातारणात पार पडला. या विद्यार्थी स्नेह संमेलनास मा. कुलगुरू महोदय, डॉ. पंडित विद्यासागर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. रात्रौ ९ ते १०.३० वा. बक्षिस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

* दि. ०१ मे, २०१६ रोजी महाराष्ट्रदिनानिमित्त विद्यापीठ प्रांगणात आयोजित ध्वाजारोहन कार्यक्रमात विभागामार्फत राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग.